मुंबई विद्यापीठ

क्रं. घ.म./ **९०** / २०१३ - २०१४

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अनुदानीत संस्थाचे संचालक व महाविद्यालयाचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, माहिती अधिकार कायदा २००५ अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर सार्वजनिक प्राधिकरणाने माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४(१) (ख) नुसार १७ मुद्यांची माहिती त्यांना त्यांच्या संकेत स्थळावर ठेवणे बंधनकारक आहे. मात्र असे निदर्शनास येत आहे की, माहितीचा अधिकार कायदा २००५, नुसार संस्थेच्या संचालक / प्राचार्यांनी ४(१) (ख) अन्वये १७ मुद्यांची माहिती संस्थेच्या / महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर ठेवलेली नाही.

राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग यांनी दिनांक १६/०८/२०१३ रोजी दिलेल्या आदेश क्र. मुमाआ-२०१३/४१६/२०१२/तक्रार क्र. ६५८/०२ नुसार अनुदानित संस्थाचे संचालक व महाविद्यालयांचे प्राचार्य यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी तात्काळ संस्थेच्या / महाविद्यालयांच्या संकेत स्थळावर ४(१)(ख) नुसार १७ मुद्यांची माहिती ठेवावी व तसा अहवाल विद्यापीठास **१५ सप्टेंबर, २०१३ अथवा त्यापूर्वी** सादर करावा. ज्या महाविद्यालयांकडून सदरबाबत अनुपालन केले जाणार नाही त्यांच्याबाबतचा अहवाल राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग यांना पाठविण्यात येईल.

आपल्या स्तरावरील माहिती अभावी माहिती पाठविण्यास विलंब झाल्यास त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- **४ सप्टेंबर, २०१३**

(डॉ. राजपाल हांडे)
संचालक (बीसीयुडी)
मुंबई विद्यापीठ

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अनुदानीत / विनाअनुदानीत संस्थाचे संचालक व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे माहितीकरीता व तात्काळ कार्यवाही करण्याकरीता अग्रेषित.

प्रत माहीतीसाठी रवाना :-

१. श्री रत्नाकर गायकवाड, राज्य मुख्य माहिती आयुक्त, नवीन प्रशासन भवन, १३ वा मजला, मादाम कामा रोड, मंत्रालय समोर, मुंबई - ४०० ०३२.
२. मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
४. मा. सह-संचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, ३, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१.
५. मा. सह-संचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जिल्हा - रायगड - ४१० २०६.
६. प्र.गि. कानडे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
७. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
८. स्वीय सहाय्यक, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
९. स्वीय सहाय्यक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
१०. स्वीय सहाय्यक, संचालक-बीसीयुडी, फोर्ट, मुंबई विद्यापीठ - ४०० ०३२.
११. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

(डॉ. राजपाल हांडे)
संचालक (बीसीयुडी)
मुंबई विद्यापीठ